नियमीत फौ. ख. क्र. १०/२०२३
सरकार -वि.- संदेश
नि.क्र. ५.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - मुकेश बंडू रंधई,
वय २८ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – वणी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

<u>**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**</u>

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज कोर्टात हजर नाही. घटना दिनांक २२.०१.२०२३ रोजी सायं.७.३० वा. मी व निखील बारेकर गावाच्या चौकात बोरींगजवळ बसलो असताना दुचाकीवर नयन मून हा आला व मला शिवीगाळ करु लागला. तेव्हा मी त्याला म्हटले की, शिवीगाळ कोणाला करतो, तेव्हा तो म्हणाला की, तुला शिवीगाळ करतो. त्यावरुन मी त्याला थापड मारली व म्हणालो की, याच्यापुढे शिवीगाळ करायची नाही. त्यानंतर मी रात्री ८.०० वा. घरी गेलो व रात्री ८.३० वा. च्या दरम्यान जेवन करीत असताना नयन मून व टायसन उर्फ अखिल आंबूळकर हे दोघे आले व मला घराच्या बाहेरुन शिवीगाळ करु लागले. मी बाहेर येऊन पाहिले असता टायसन याने खोक्यातून एक तलवार बाहेर काढली व मला मारायला लागला तेव्हा मी ती तलवार माझ्या डाव्या हाताने अडवली त्यामुळे हाताच्या पंज्याला जखम झाली. तेव्हा मी ओरडलो असता आजूबाजूचे लोक जमा झाले. त्यामुळे तो मला बाहेर भेट व जिवे ठार मारेल अशी धमकी देऊन तलवार माझ्या हातात सोडून पळून गेला. त्यानंतर मी माझा भाऊ शैलेश रंधई याला घेऊन पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.६** देण्यात येते. आता मला दाखविलेला छापिल प्रथम खबर अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७** देण्यात येते. मी फिर्याद देण्यास गेलो तेव्हा तलवार पोलीसांना दिली होती. ज्या तलवारीने मला मारहाण झाली ती मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला

दाखविलेली तलदार तीच आहे. त्यास **आर्टिकल 'अ'** देण्यात येते. पोलीसांनी घटनास्थळाचे फोटो माझ्या समक्ष काढले होते. आता मला दाखविलेले फोटो तेच आहे. त्यास **आर्टिकल 'ब व क '** देण्यात येते.

सरतपास संपला.

**नि.क्र.८ वरील आदेशावरुन उलट तपासाकरिता तहकुब करण्यात येते.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ०७.०४.२०२५.

स्वा/-
(एस.जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.